स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **28–05–2010** रोजी दुपारी **12–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 5. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 6. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 7. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |
| 8. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 10. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 11. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |

रिक्त स्थान – 4

## उपस्थित अधिकारी

1) श्री. आर. झेड. सिद्दीकी, उपनिगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 34</u> :— जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत आलेली 300 बसेस करिता 600 Electronic Bus Ticketing Machines (Indian Makes) with RFID करिता Supply. Implementation (Commissioning) and Post Sale Service इत्यादी करिताची उघडण्यात आलेली तिन ई–निविदा पैकी मे. शांतीतारा इन्फ्रास्ट्रक्चर्स (इंडिया) प्रा. लि. यांची निम्नतम निविदा दर सर्व करासह रुपये 15,300/— प्रति मशीन प्राप्त झालेली असुन या करीता रुपये 91,80,000/— खर्च अपेक्षीत आहे.

या नंतर म.न.पा. चे बस ऑपरेटर मे. वंश निमय इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. यांनी दिनांक 01.04.2010 रोजी दिलेले पत्रान्वये त्याची Balaji ETIM रुपये 11,000/— अधिक या वर येणारे इतर करासह प्रति मशीन प्रमाणे पुरवठा करण्या बाबतचे पत्र दिलेले आहे.

या वर खालील प्रमाणे स्थायी समिती कडे पाठविण्यास प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

300 बसेस करिता 600 Electronic Bus Ticketing Machines (Indian Makes) with RFID करिता Supply. Implementation (Commissioning) and Post Sale Service करिता म.न.पा. चे बस ऑपरेटर मे. वंश निमय इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि यांना निविदेत दिलेले स्पेशीफिकेशन प्रमाणे खरेदी करण्यास परवानगी देणे. ही सर्व मशीन कन्सल्टंट कडून तपासून प्रमाणित करवुन घेणे. या कामाकरिता लागणारी रक्कम प्रथम बस ऑपरेटर देईल आणि नंतर या रकमेचे समायोजन 300 बसेस चालविण्या करीता च्या प्रस्तावा अंतर्गत बस ऑपरेटर महानगरपालिकेला देणारे 30 टक्के रक्कम म्हणजे रुपये 19.08 कोटी मधुन करेल.

या प्रमाणे प्रस्तावा वर यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन बस ऑपरेटर मे. वंश निमय इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. ली. यांनी Electronic Bus Ticketing Machines या निविदा प्रक्रियेत सहभाग न घेतल्याने, त्यांचा अर्जाचा प्रश्न विचारात घेणे हे नियमाप्रमाणे नाही. असे कार्यालयाचे मत आहे. त्यामुळे स्थायी समितीस त्यांचा अर्ज विचारात घेणे अयोग्य वाटते.

मुळ निविदा काराने म्हणजेच शांतीतारा इफ्रास्ट्रक्चर्स (इंडिया) यांचा प्रा. लि. यांचा निम्नतम दराचा अर्जाचे कार्यालयाने वाचन केल्या प्रमाणे रु. 12740 (रु. 11000+कर) हा निविदाकार या निविदाप्रक्रियेत सहभागी व निम्नतम असल्यामुळे नियमाप्रमाणे मे. शांतीतारा इन्फ्रास्ट्रक्चर्स यांच्या दरास एकमताने मंजूरी प्रदान करते. त्यांना हे काम देण्यास सुध्दा एकमताने मंजूरी प्रदान करते.

<u>ठराव क्रमांक 35</u> :— "Agent Management Software" तयार करण्याकरिता M/s. National Education, नागपूर यांना स्थायी समिती ठराव क्र. 217, दिनांक 15.01.2010 रोजी अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. या Software मध्ये SMS Facility चा अंतर्भाव नव्हता. त्यामुळे मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार SMS Facility चा अंतर्भाव करण्याकरिता M/s. National Education, नागपूर यांना पत्राद्वारे विचारणा केली असता त्यांनी प्रति Transaction रु. 1.60 चा दर दिलेला आहे.

सबब M/s. National Education, नागपूर यांच्या SMS Facility (upto three SMSs) करीता transaction रु. 1.60/- चा दर स्विकारण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने नामंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 36</u> :- महिला व बाल कल्याण समितीद्वारे म.न.पा. च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींना कराटेचे प्रशिक्षण देण्याकरीता आवेदनातील 12 संस्थेपैकी 8 संस्थेचे निम्नत्तन दराच्या दर रु. 295/- प्रति विद्यार्थी असा असल्यामुळे म.न.पा. च्या शाळेतील रु. 295/- प्रति विद्यार्थीनिंप्रमाणे एकुण 13,024 विद्यार्थीनींना कराटेचे प्रशिक्षण 1 महिण्याकरीता एकूण रु. 38,42,080/- राशीचे प्राकलन खर्चास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने नामंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 37</u> :- वार्ड क्रमांक 97 खरबी रोड नागपूर घरमालक श्री. तुकाराम जगन बोकडे यांचे इमारतीत महानगरपालिकेची श्रीरामनगर, हिंदी प्राथमिक शाळा भरत आहे व घरमालकास दरमहा रु. 2600/- किराया देण्यात येत आहे.

मा. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकामास विभाग, यांचेकडून 5,220/- रुपयांचे रेंट प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

करिता निर्देशित किराया मंजूर करुन बकाया काढण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 38</u> :- अंबाझरी उद्यानाचा विकास बी.ओ.टी. धर्तीवर करण्याकरीता बी.ओ.टी. ऑपरेटरकडे हे उद्यान विकास, संचलन, देखभाल व व्यवस्थापनाकरीता जास्तीत जास्त 20 वर्षाकरीता सोपिविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 39</u> :- गणेश नगर, आझाद पार्क वॉर्ड क्र. 100, येथील प्रस्तावित उद्यानात विविध स्थापत्य कामाचे सुधारित रु. 13,31,218/- (कंसलटंसी चार्जेससह) तसेच एकंदरीत सुधारित प्राकलन रु. 21,67,374/- राशीचे कामास प्रशासकीय मंजूरी प्रदान करुन व रु. 13,31,218/- रकमेचे मे. जाहिद गुलरेज यांचे कडून त्यांचे मंजूर निविदा दरावर स्थापत्य कामे पूर्ण करुन घेण्यास्तव अतिरीक्त रु. 1,14,390/- राशीचे कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 40</u> :- मेसर्स विदर्भ इन्फोटेक प्रायव्हेट लिमीटेड, रामदासपेठ, नागपूर यांना जकात विभागाच्या नाक्यावर संगणक प्रणाली द्वारे Online जकात रशीद Print करुन व Paper Scanning करणे चे काम दिलेले आहे.

निविीदेतील मुळ Software Program मध्ये Updation करुन चुंगीकर निर्धारण होणे करीता मा. निगम आयुक्त यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे Updated Software Program करीता आलेल्या खर्चाची भरपाईची मागणी संबंधीत कंत्राटदाराने विनंती अर्जाद्वारे केलेली आहे. संबंधीत भरपाई आर्थीक स्वरुपात न करता संबंधीत कंत्राटचा तीन वर्षाच्या कालावधी संपूष्ठात येताच संबंधीत कार्याकरीता नवीन निविदे प्रक्रियेत संबंधीत कंत्राटदाराला लघुत्तम दर प्राथम्य (First Right to Refusal) देणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 41</u> :– वार्ड क्र. रमाबाई आंबेडकर नगर, टाकळी सिम येथील रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता मे. भगतसिंग राहेल यांची प्राकलनिय दरापेक्षा 7. 75% नि कमी दराची रु. 1844649.45/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 42</u> :– आरोग्य विभागातर्फे शहराच्या विविध दहनघाटावर मृतदेहांना अग्नी देण्याकरिता लाकुड पूरवठा करण्यासंदर्भात दोन वर्षासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या परंतु तांत्रीक बाबीची पुर्तता केली नसल्यामुळे एक निविदा Online द्वारे रद्द झाली त्यामुळे एकमेव निविदाकार मे.महेश सेल्स कॉरर्पोरेशन नागपूर या निविदाकाराचे दर रु. २६९१/– प्रती टन प्राप्त झाले आहे. दहनघाटावर लाकडाचा अपूरा, खंडीत, अनियीमत व कमी दर्जाचा पूरवठा झाल्यास प्रसंग अतिशय गंभीर व संवेदनशील होऊन असंतोष निर्माण होतो व मनपाची बदनामी होऊ शकते. पूरवठा अनियमीत किंवा खंडीत किंवा अयोग्य दर्जाचा झाल्यास खुल्या बाजारामधुन किंवा आवेदन मागवून लाकडे खरेदी करण्यात येऊन फरकाची रक्कम निविदाकाराकडुन वसुल करण्यात येईल.

प्रती टन रु.२६९१/– दर मंजूर करुन अंदाजीत ४६८५ टन लाकडांवर रु. १,२६,०७,३३५/– चा खर्च अपेक्षीत राहील. पद क्रं. ३०६ मधुन खर्च भागवून सन २०१०–११ वित्तीय वर्षात रु.१५० लक्षाची तरतुद वाढवून अतिरिक्त

प्रावधानाची तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 43</u> :– आरोग्य विभागातर्फे काढण्यात येणारा नाल्यातील रेता/गाळ/कचरा, वार्डामधे सार्वजनीक जागांवर पडलेली माती/टाकाऊ बांधकाम साहित्य तसेच नागरिकांच्या घरा समोरील पडलेले टाकाऊ बांधकाम साहित्य/माती (वास्तविक खर्चाच्या दुप्पट प्रशासकिय खर्च आकारुन) इत्यादी वजनाच्या आधारावर उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावण्याकरिता मे.पुरुषोत्तम किरपाने, नागपूर यांचे रु.२३९/— प्रतिटन निम्मतम दर प्राप्त झाले असून विभागाची आवश्यकता लक्षात घेता इतर दोन निविदाकार (१) मे.यशोदा अर्थ मुव्हर्स व (२) मे.अवस्थी ट्रेडर्स, नागपूर हे निम्मतम दरावर काम करण्यास तयार असल्यामुळे तिनही निविदाकारांना होणारा वार्षीक खर्च रु. ७५ लक्ष अपेक्षीत धरुन दोन वर्षाकरीता पद क्र.२७७ मधून किंवा इतर उपलब्ध प्रावधनामधून खर्च भागवून काम देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 44</u> :– नागपूर महानगरपालिकेतील आरोग्य विभागार्फे शहरात विविध ठिकाणी रस्त्यांच्या बाजुला असलेले फायबरचे मुत्रीघर, सिमेंट कांक्रीट मुत्रीघर व वार्डी मधील सार्वजनिक शौचालयाची सतत २४ तांस निगा देखभाल व स्वच्छता ठेवण्याकरिता दोन वर्षाच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त पांच निविदा पैकी मे.ब्रिक्स फॅसिलीटीज प्रा.लि, नागपूर यांचे निम्मतम दर प्राप्त झाले असून दरकरार दोन वर्षासाठी मान्य राहील. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निम्मतम निविदाकारास मा.आयुक्त यांच्या अधिकारात एक महिन्यासाठी कार्यादेश देण्यात येऊन उर्वरित कार्यादेश मा. स्थायी समिती द्वारा मंजुरी प्राप्त झाल्यानंतर देण्याची प्रक्रिया केली जाईल. कंत्राटदारास

खालील प्रमाणे प्रथम एक वर्षासाठी कार्यादेश देण्यात येईल व काम समाधानकारक आढळल्यास दुस—या वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येईल.

(1)

| मुत्रीघरांची (एफ.आर.पी.) व सिमेंट कांक्रीट मुत्रीघर सतत 24 तास निगा, देखभाल व स्वच्छता ठेवण्याकरिता मासिक दर | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of Contractor** | **Zone 1** | **Zone 2** | **Zone 3** | **Zone 4** | **Zone 5** | **Zone 6** | **Zone 7** | **Zone 8** | **Zone 9** | **Zone 10** | **Total** |
| 1 | Brisk Facilities Pvt. Ltd, Nagpur | Rs.23700/- | Rs.23180/- | Rs.24510/- | Rs.96710/- | Rs.20710/- | Rs.79610/- | Rs.49780/- | Rs.29830 | Rs.33250 | Rs.63080 | **444360** |

(2)

| सार्वजनिक संडास सतत 24 तास निगा, देखभाल व स्वच्छता ठेवण्याकरिता मासिक दर | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of Contractor** | **Zone 1** | **Zone 2** | **Zone 3** | **Zone 4** | **Zone 5** | **Zone 6** | **Zone 7** | **Zone 8** | **Zone 9** | **Zone 10** | **Total** |
| 1 | Brisk Facilities Pvt. Ltd, Nagpur | Rs.7600/- | Nil | Nil | Rs.182400/- | Rs.15200/- | Nil | Rs.144400/- | Nil | Rs.76000/- | Rs.98800/- | **524400** |

उपरोक्त प्रमाणे दोन्ही कांमावर वार्षिक रु. १,१६,२५,१२०/— होणारा खर्च दोन वर्षाकरीता पद क्रं. २७६ व २४० मधून किंवा इतर उपलब्ध प्रावधनामधून मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दोन वर्षासाठी कार्यादेश देण्याच्या अटीवर या विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 45 :— नागपूर महानगरपालिकेतील मा. पदाधिकारी यांना कार्यालयीन वापरासाठी दोन ॲम्बासिडर ग्रॅन्ड (1-8 ISZ) बि. मालाणी ॲन्ड कंपनीकडून 11,72,800 रुपयात व एक टाटा मान्झा ॲक्वा सफायर टाटा मोटर्स लिमीटेड मुंबई यांच्या कडून 4,84,083 रु. खरेदी तसेच वाहनाचे एक्सेसरिज 27,675 रु. जायका मोटर्स लिमीटेड कडून खरेदी करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 46 :— म.न.पा. च्या विविध विभागा तर्फे (2) दोन लक्ष रुपयाचे वर दिलेल्या संविदाचे वर्क ऑर्डर च्या अनुषंगाने कलम 63 (डी) नुसार नोंद घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्याची एकमताने नोंद घेतली.